# प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रोटरी क्लब अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने

## 'Omicron & Covid 19 Vaccination ...Where do we Stand??....'

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रोटरी क्लब अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक 21 जानेवारी 2022 रोजी 'Omicron & Covid 19 Vaccination ...Where do we Stand??....' या चर्चा सत्राचे ऑनलाईन facebook live पद्धतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले सदर कार्यक्रमात प्रमुख वक्ते डॉ. राजेंद्र चांदोरकर ( बालरोग तज्ञ ) ,डॉ. चंद्रकांत वाजे ( स्त्री रोग तज्ञ ) , डॉ. सचिन जायभाये ( मधुमेह तज्ञ ), डॉ. अनिल डोंगरे ( मानोसोपचार तज्ञ ), डॉ. दीपक गोसावी ( लॅबोरेटरी तज्ञ ) उपस्थीत होते तसेच श्री. मंगेश रानवडे यांनी चर्चा सत्रात मॉडेरेटर म्हणून भूमिका निभावली कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयलायचे प्रभारी प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षीय वक्तव्य केले तसेच कला विभाग प्रमुख प्रा. नम्रता पाटील उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. दिनेश पाटील यांनी केलं तर कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. रवींद्र पाटील व प्रा. अमिता महाले यांनी केलं सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक उपस्थित होते.




Prabhakar Patil Education Society's
Arts, Commerce & Science College, Veshvi - Alibag
NSS Unit
&
Rotary Club of Alibag, Seashore
Jointly Organise
Panel Discussion On
"Waves Of Covid -19,
Panellists
Live On /pngacscollege
Prabhakar Patil Education Society's
Arts Commerce Science College,
PNP















## अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२३ जानेवारी**

१) श्री. सदानंद बालकृष्ण नर्वेकर आक्षी, नु.आक्षी, पो.आगाव ता.अलिबाग

## म ह त्वा चे

### रिपाई शिष्टमंडळाने घेतली आयुक्तांची भेट

| पनवेल | वार्ताहर |

रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाने विविध मागण्यासांठी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांची भेट आहे. या भेटीत करण्यात आलेल्या चर्चेअंती अभिजित बांगर यांनी मागण्या सोडण्यासंदर्भात आश्वासन दिले आहे. या भेटीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले) वतीने नवी मुंबई जिल्हाध्यक्ष सिद्राम ओहोळ यांच्या नेतृत्वाखाली आरपीआयचे मराठा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मिरजे, युवा नेते यशपाल ओहोळ, नंदा गायकवाड, बाबा माने, शशिकांत कासारे, मुकेश गायकवाड आदी उपस्थित होते.

# कोरोना ही शापित पर्वणी

**डॉ. चांदोरकर यांचे प्रतिपादन**

▸ पीएनपी नाट्यगृहात 'कोव्हिड १९ : काल, आज आणि उद्या' चर्चासत्र संपन्न



(छायाचित्र: अमोल नाईक)

| अलिबाग | प्रतिनिधी |

कोरोना ही शापित पर्वणी असल्याचे प्रतिपादन रोटरी क्लबचे अध्यक्ष बालरोग तज्ज्ञ डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी केले आहे. पीएनपी वरिष्ठ महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग राष्ट्रीय सेवा योजना विभाग तथा रोटरी क्लब, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कोव्हिड १९ : काल, आज आणि उद्या' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आपल्या मार्गदर्शनात डॉ.चांदोरकर यांनी कोरोना काळातील वैद्यकीय भूमिकेसंदर्भातही माहिती दिली. ते म्हणाले की, कोरोनाचा लहान वयोगटातील मुलांवर कमी प्रमाणात परिणाम झाला. कारण ते प्रमाण सौम्य होते. पण जर कोरोना रुग्ण वाढले तर त्या रुग्णासाठी अलिबागमध्ये हॉस्पिटल नव्हते. यामुळे परिस्थितीभावी या रुग्णांना मुंबईकडे रवाना करावे लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. याशिवाय कोरोनासंदर्भात ६० हॉस्पिटलमध्ये रुग्णसेवा देत असंख्य रुग्णांना बरे केले असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. तर १५ ते १८ वयोगटातील मुलामुलांचे लसीकरण करण्यात येत असून, त्याचा लाभ घेण्याचे आवाहनही डॉ.चांदोरकर यांनी केले आहे.

स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत वाजे यांनी प्रसूतीबाबत, प्रसूतीनंतर घेतलेली विशेष काळजी काळजी याबाबत विश्लेषण केले. तर गरोदर स्त्रियांमध्ये लस घ्यावी की नाही, हा संभ्रम होता. पण लस घ्यावीच असा आम्ही सर्व डॉक्टरांनी सल्ला दिला होता. लस घेतल्यामुळे अपत्यावर कोणताही परिणाम होत नसल्याचे त्यांनी पटवून दिले.

याशिवाय, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अनिल डोंगरे यांनी कोरोनाचा लोकांच्या मानसिकतेवर कशा प्रकारे त्याचा परिणाम झाला हे नमूद केले. कोव्हिड फोबिया याबाबत माहिती देताना लोकांनी कोरोनासंदर्भातील संभ्रम दूर ठेवण्याचे आवाहन केले. तर कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता तज्ज्ञांचा सल्ला घेण्याची आवश्यकता हृदयरोग व मधुमेह तज्ज्ञ डॉ. सचिन जायभाई यांनी प्रतिपादीत केली. तसेच रक्तपेढी तज्ज्ञ डॉ.दीपक गोसावी यांनी सिटी व्हॅल्यूबाबत माहिती दिली.

> आपले आरोग्य हे आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीवर आधारलेले आहे. कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत तणावग्रस्त अवस्थेमुळे प्रतिकारशक्तीचा शीण झाल्याने मृतकांची संख्या वाढली. त्यामुळे जरी टेस्ट पॉझिटिव्ह आली तरी न घाबरता आपण बरे होणारच, या इच्छाशक्तीच्या जोरावर कोरोनावर मात करा.
>
> **- डॉ. अनिल डोंगरे, मानसोपचार तज्ज्ञ**

पीएनपी नाट्यगृहात संपन्न झालेला हा कार्यक्रम कोव्हिड नियमांचे पालन करून फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून घेण्यात आला. या कार्यक्रमास रायगड आरोहेड लॅब सर्विसेस संचालक मंगेश रानवडे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, सत्राचे अध्यक्ष डॉ. ओमकार पोटे, प्रा. नम्रता पाटील, शेकापचे पुरोगामी युवा संघटनेचे अध्यक्ष विक्रांत वार्डे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रविंद्र पाटील, प्रा. दिनेश पाटील तथा शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निवेदकाची जबाबदारी मंगेश रानवडे यांनी पार पाडली.

## जिल्ह्यातील दोन महामार्गांवर अपघात

**अलिबाग** : जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्ग तसेच मुंबई-पुणे महामार्ग या दोन महामार्गाच्या परिसर भागात वाहकचालकांच्या चुकीमुळे अपघात झाल्याच्या घटना घडली आहे. याप्रकरणी अनुक्रमे वडखळ तथा खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अपघातातील पहिल्या घटनेची हकीगत अशी की, घटनेतील फिर्यादी आपल्या बुलेट (क्र.एमएच/०६/सीबी/५६७६) या दुचाकीने मुंबई गोवा महामार्गावरुन जे.एस.डब्लू. कंपनी ते पांडापूर असा प्रवास करीत होते. तर आरोपी हा त्याच्या इको (क्र.एमएच/०६/एस/६७८५) या चारचाकी गाडीने वाहतूक नियमांचे उल्लंघन करत वडखळ येथे जात होता.

दरम्यान ते कासु ग्रामपरिसरानजीक प्लायओव्हरवर आले असता, आरोपीने पाठीमागून फिर्यादीच्या वाहनास ठोकर दिल्यामुळे अपघात घडला. या अपघातात दोन्ही वाहनस्वारांना दुखापत झाली असून, वाहनांचेही नुकसान झाले आहे.

तर दुसऱ्या घटनेची हकीगत अशी की, आरोपी हा

# क्राईम डायरी

तरी या दोन्ही अपघातासंदर्भात अधिक तपास पोलीस यंत्रणेकडून करण्यात येत आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण

**खालापूर** : परिसरात एका महिलेचे लग्नाचे आमिष दाखवत लैंगिक शोषण केल्याची घटना घडली आहे. या घटनेतील पिडीता ही पेण तालुक्यातील दिघी परिसरातील रहिवासी आहे तर आरोपी (५५) हा सांताक्रुझ (पू) मुंबईचा रहिवासी आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, आरोपीने पिडीतेस लग्नाचे आमिष दाखवत खालापूर येथील एका हॉटेलमध्ये तिच्या इच्छेविरुद्ध दोन वेळा शरीर संबंध प्रस्थापित केले.

याप्रकरणी खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोलीस सब इन्सपेक्टर आरोटे करीत आहेत.

### बेसावधानतेचा फायदा घेत हजारोंची चोरी

**वडखळ** : पेणपरिसरातीलएका घरात कुटुंबियांच्या बेसावधानतेमुळे चोरी झाल्याची घटना उघडकीस आहे. पेण तालुक्यातील

### मुरुड पोलिसांची अवैध दारुवर कारवाई

**मुरुड** : परिसरातील एकदरा गावात अवैधरित्या चालणाऱ्या गावठी दारु धंद्याविरोधात मुरुड पोलिसांनी कारवाई केली आहे. याबाबत पोलिसांना गोपनीय सुत्रांकडून माहिती मिळाली असून, दाखल गुन्ह्यानुसार आरोपी हा तालुक्यातील एकदरा या परिसराचा रहिवासी आहे. याने त्याच्या राहत्या घरात अवैधरित्या हातभट्टीची गावठी दारु बाळगली होती. याप्रकरणी अधिक तपास पोलीस नाईक रोहेकर करीत आहेत.

### मोकाट कुत्र्यामुळे वाहनांचा अपघात

**पोयनाड** : मांजर आवडी गेल्याने काम होवो न होवो, पण वाहनाने प्रवास करत असताना एखादा मोकाट प्राणी अचानक आडवा गेला तर अपघात नक्कीच होतो. अशीच एक घटना डबेवाडी ग्रामपरिसरात घडली आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेतील फिर्यादी हे ट्रकद्वारे पेझारी ते नागोठणे असा प्रवास करीत होते. दरम्यान, पेझारीकडे जाणाऱ्या एका फॉरेस्ट जीपच्या समोर मोकाट कुत्रा आडवा आला असता जीप